झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा ३/झोपुआ/५८८/२०२३
दिनांक : १७ / ०७ /२०२३

झोपडपट्टी पुनर्वसन आदेश (अंतिम)

**महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये अंतिम आदेश**

प्रस्तावना -

मौजे - वाकड, जिल्हा - पुणे येथील स.नं.२०६/१/१ पैकी सि.स.नं.१३७३ अनुसुचीत नमूद केलेल्या क्षेत्रासंदर्भात महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) अंतर्गत खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करणेत येत आहेत.

(१) ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) मध्ये नमूद तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करणेकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे हे सक्षम आहेत; आणि

(२) ज्याअर्थी, अनुसुचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दि.०३/०५/२०२३ रोजीची पूर्वसूचना प्रत्यक्ष जागेवर दि.०५/०५/२०२३ रोजी डकविण्यात आली असून दि.०९/०५/२०२३ रोजीच्या स्थानिक वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे आणि महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग-१, पुणे विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, मे १८-२४, २०२३ मध्ये पृष्ठ क्र.६-७ वर प्रसिध्द करण्यात आली आहे; आणि

(३) ज्याअर्थी उप अभियंता, तांत्रिक विभाग क्र.३, झोपुप्रा, पुणे यांनी दि.१७/०४/२०२३ रोजीच्या पत्रान्वये ७/१२ उता-यानुसार येणारे क्षेत्र हे २१०००.०० चौ.मी. इतके आहे व मोजणी नकाशानुसार त्रिमितीय पध्दतीने येणारे क्षेत्र हे ८४४७.८७ चौ.मी. इतके आहे, असे कळविले आहे. त्यामुळे सदर योजनेकरिता विचारात घ्यावयाचे कमीत कमी क्षेत्र ८४४७.८७ चौ.मी. इतके क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

(४) ज्याअर्थी, सदरची पूर्वसूचना प्रसिध्द करणेत येवून ३० दिवसांचा कालावधी पूर्ण झाला आहे. सदर पूर्वसूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे जागा मालक किंवा इतर यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत या कार्यालयाकडे सादर करणेबाबत फर्मावण्यात आले होते. त्यानुसार अद्यापपर्यंत या कार्यालयाकडे सदर बाबत कोणतीही हरकत अथवा लेखी तक्रार प्राप्त झालेली नाही; आणि

(५) ज्याअर्थी, सदर क्षेत्रावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबतच्या कार्यान्वयना संदर्भात कोणताही प्रतिबंधात्मक आदेश नसल्यामुळे व झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसंदर्भातील परिस्थिती अस्तित्वात असल्याने सदर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करणेबाबत पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे; आणि

(६) ज्याअर्थी, सदर योजनेकरिता वर नमूद मुद्दा क्र. ३ पैकी कमीत कमी क्षेत्र ८४४७.८७ चौ.मी. इतक्या क्षेत्राकरिता अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीकरिता झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेश ३(क) अंतिम करणे क्रमप्राप्त आहे.

त्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमूद एकूण ८४४७.८७ चौ.मी. एवढे योजना क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झाल्याने उपरोक्त परिस्थितीचे अवलोकन करता सदर अधिनियमातील कलम ३(क) च्या तरतुदीनुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश :-**

(१) अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) अंतर्गत या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून अंतिमतः घोषित करण्यात येत आहे.

(२) सदरच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, उक्त अधिनियमाच्या कलम ३क मधील तरतूदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई येथे अपील दाखल करता येईल.

## अनुसूची

**झोपडपट्टीचे नाव** :- वाकड, जिल्हा - पुणे,स.नं.२०६/१/१ पैकी सि.स.नं.१३७३ पैकी
**महानगरपालिका क्षेत्र** :- पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

| गाव- वाकड, जिल्हा - पुणे | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| स.नं./ सि.स.नं. / फा.प्लॉ.क्र | जमीन/ भोगवटदाराचे हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ. मी.) | योजनाक्षेत्राची चतु:सिमा | | | |
| | | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| स.नं.२०६/१/१ पैकी सि.स.नं.१३७३ पैकी | पिंपरी चिंचवड महानगरपालिका | ८४४७.८७ चौ.मी. | स.नं.२०८ पैकी सि.स.नं. १३६७ पै , १६६५पै, १४०७पै, १३८६पै,१३८५पै १३६४पै | स.नं.२०६ पैकी सि.स.नं. १३७३ पैकी | स.नं.२०६ पैकी व सि.स.नं. १३७३पै | स.नं.२०६ पैकी सि.स.नं. १३७३ पैकी व रस्ता |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक :- १८ / ०८ /२०२३

(नीलेश गटणे) (भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत-

१. मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी चिंचवड पुणे यांना- माहितीस्तव सादर व उचित कार्यवाहीस्तव.
२. मा.उपआयुक्त तथा सक्षम प्राधिकारी, झो.नि.पु., पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना- माहितीस्तव.
३. मा.आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे (PMRDA) - यांना पुढील कार्यवाहीस्तव.
४. स.नं.२०६/१/१ पैकी अन्य वहिवाटदार.